१. जिल्हा परिषद अधिकारी / कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत ओखळपत्र लावणेबाबत.
२. नस्ती निर्णयासाठी सादर करतांना घ्यावयाच्या दक्षता.

**नाशिक, जिल्हा परिषद नाशिक**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**परिपत्रक क्रमांक-साप्रवि/आस्था/६-२६०/२०१७**
**नाशिक दिनांक ११ मे २०१७**

परिपत्रक :

माझे असे निदर्शनास आले आहे की, जिल्हा परिषद अंतर्गत बरेचशे अधिकारी / कर्मचारी हे बरेचदा स्वत:चे शासकीय ओळखपत्र न लावताच कार्यालयात उपस्थित / कार्यरत असतात. जिल्हा परिषदेत सद्यस्थितीत नव्याने पदाधिकारी स्थानापन्न झालेले असलेले त्यांना देखील जिल्हा परिषदेचे अधिकारी / कर्मचारी यांची ओळख नाही. जिल्हा परिषद अंतर्गत वेगवेगळ्या कामासाठी ग्रामस्थ / सदस्य/ पदाधिकारी हे त्यांचे कामाची / योजनांची अद्यावत माहिती घेणेकामी जिल्हा परिषदे मध्ये येत असतात. परंतु, जिल्हा परिषद अधिकारी / कर्मचारी हे ओळखपत्र लावत नसल्याने संबंधित ग्रामस्थ यांना कोण अधिकारी / कर्मचारी आहेत हे ओळखणे सहज शक्य होत नाही व ग्रामास्थांचा बहुमुल्य वेळ वाया जातो. तसेच विभाग प्रमुख त्यांच्या विभागाच्या नस्ती निर्णयासाठी सादर करतांना नस्तीचे संबंधीत विषयाचे अधिकार, प्रचलित शासन नियम, शासन निर्णय, परिपत्रक इत्यादी बाबी नस्तीस जोडून सादर न करता नस्ती निर्णयासाठी सादर केली जाते. नस्ती निर्णयासाठी सादर करतांना नस्ती सादर करणाऱ्या कर्मचारी / अधिकारी यांचे नांव व पदनाम नस्तीमध्ये नमूद न करताच नस्ती निर्णयासाठी सादर केल्या जातात. सदर बाब ह्या अत्यंत गंभीर स्वरुपाच्या असून अनियमितता करणाऱ्या आहेत. त्यानुषंगाने या परिपत्रकान्वये खालीलप्रमाणे सुधारित सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. जिल्हा परिषद अधिकारी / कर्मचारी यांनी संपूर्ण कार्यालयीन कामकाजाच्या वेळेस दर्शनिय भागास आपले स्वत:चे ओळखपत्र लावणे हे बंधनकारक आहे.
२. जिल्हा परिषदेतील जे अधिकारी / कर्मचारी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेस ओळखपत्र लावणार नाहीत अशा अधिकारी यांचे विरुद्ध **महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९** व कर्मचारी यांचे विरुद्ध **महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक ) नियम १९६७** नुसार योग्य ती प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित केली जाईल.
३. सर्व गट ड ( वर्ग - ४ ) **परिचर** कर्मचारी यांनी गणवेशातच कार्यालयात वेळेवर ओळखपत्रासह उपस्थित राहणेबाबत खातेप्रमुख, गट विकास अधिकारी व इतर खातेप्रमुख यांनी आपले अधिनस्त असलेले परिचर कर्मचारी यांना सुचना देण्यात याव्यात. तसेच सुचना देऊनही **जे परिचर (वर्ग-४) कर्मचारी तंतोतंत पालन करणार नाहीत, अशा परिचर कर्मचाऱ्यांचा प्रशासकीय कार्यवाहीचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडेस सादर करण्याची कार्यवाही करावी.**
४. सर्व विभागप्रमुख यांनी त्यांचे विभागाच्या नस्ती निर्णया करीता सादर करतांना नस्तीच्या विषयाशी संबंधित अधिकार, शासन नियम, शासन निर्णय, परिपत्रक इत्यादी नस्ती समवेत जोडूनच नस्ती सादर करावी. तसेच नस्ती सादर करणाऱ्या संबंधित कर्मचारी / अधिकारी यांचे नांव व पदनाम नमुद करुनच नस्ती निर्णयासाठी सादर करावी.
५. हे परिपत्रक सर्व संबंधितांत्या निदर्शणास आणून देणेत यावे.
६. प्रस्तुत परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन होईल या दृष्टीने सर्व विभागप्रमुख, गट विकास अधिकारी व इतर खातेप्रमुख यांनी दक्षता घ्यावी.
७. हे परिपत्रक **जिल्हा परिषदेच्या संकेतस्तळ** www.zpnashik.maharashtra.gov.in यावर उपलब्ध आहे.

( दीपक कुमार मीना )
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

**प्रति,**

१. प्रकल्प संचालक, जिग्राविय, नाशिक
२. विभागप्रमुख, जिल्हा परिषद नाशिक (सर्व)
३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
४. खातेप्रमुख (इतर) मुख्यालय व पंचायत समिती (सर्व)

**प्रतिलिपी महितीसाठी सविनय सादर.**

अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक